# कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराजांच्या काळातील व्यापार व्यवस्थेचा आढावा

**दत्तात्रय रमेश मचाले, संशोधन विद्यार्थी, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**प्रस्तावना :**प्राचीन काळापासून भारतात व्यापार चालत असल्याचे विविध पुराव्यांवरून आढळून येते. सिंधू संस्कृतीतील, वैदिक काळात, मौर्य व गुप्त काळात अंतर्गत व परकीय व्यापाराला चालना मिळाली होती.[१] सातवाहन काळात दक्षिण भारतात पैठण बरोबरच तगर (तेर), जुन्नर, नाशिक, कऱ्हाट (कराड) आणि करवीर (कोल्हापूर) या महत्त्वाच्या बाजारपेठा होत्या. व्यापारात 'श्रेष्ठी' व 'सार्थवाह'असे दोन वर्ग होते. यातील कोल्हापूर त्यावेळचे करवीर प्रमुख बाजारपेठ होती. कोल्हापूरच्या प्राचीन इतिहासाचा शोध इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकापर्यंत जातो. आधुनिक काळात ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने व्यापाराच्या उद्देशाने इ. स. १६०८ मध्ये सुरत येथे पहिली व्यापारी वखार स्थापन केली.[२]त्यांनी आपला विस्तार वाढवला पुढे इ. स. १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळगड व आसपासच्या परिसर आपल्या ताब्यात घेतला. इ. स. १७१० मध्ये पन्हाळा या ठिकाणी मराठ्यांची गादी स्थापन झाली. यावेळी कोल्हापूर परिसरात व्यापार वाढला. कोल्हापुरात ब्रिटीशांची वखार स्थापन झाल्याने या भागात त्यांच्या व्यापारास सुरुवात झाली. ब्रिटीश अधिपत्याखाली कोल्हापूर संस्थाचा व्यापार पारंपारिकरित्या चालत आलेल्या व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ न करता ब्रिटिशांनी कोल्हापूर संस्थानातील व्यापारातील चलन व्यवस्था, वजनमापे, मुद्रा याबाबत एकरूपता आणली. व सर्व स्तरावर त्याचे एकसमान तत्व लागू केले. पण शाहू महाराजा यांच्या काळातव्यापार व्यवस्था वाढली व त्यांनी व्यापार वाढीसाठी नवीन प्रयोग करून संस्थांचा आर्थिक विकास केला.

**शाहू महाराजांच्या काळातील व्यापार व्यवस्था (१८९४-१९२२):** ब्रिटीश अधीन कोल्हापूर संस्थानात उद्योग, व्यवसाय, व्यापार इत्यादी आर्थिक व्यवहार वाढविण्याकडे पुरेसे लक्ष केंद्रित न झाल्यामुळे व्यापारावर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण अल्प होते. संस्थानातील ७५% हून अधिक लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून असून ८ % लोक घरगुती पारंपारिक लघुउद्योगावर अवलंबून होते. व्यापाऱ्यांच्या बाबतीतही स्थिती फारसी समाधानकारक नव्हती. संस्थानात प्रसिध्द अशी बाजारपेठ नव्हतीच तसेच अनेक ठिकाणी आठवडी बाजार भरत असून कोल्हापूर हे एकमेव प्रमुख व्यापारी केंद्र होते. याशिवाय वडगाव, आळते, कापशी, रायबाग यासारखी लहान व्यापारी केंद्रे होती. या व्यापारी केंद्राच्या ठिकाणी स्थानिक मालाबरोबरच बाहेरून माल येत असून या बाजारपेठेतून माल अन्य ठिकाणी विक्रीसाठी पाठविला जात असल्यामुळे व्यापाराचे स्वरूप मर्यादित होते. जेव्हा ब्रिटीश अधीन राज्यकारभार असलेले कोल्हापूर संस्थान १८९४ ला छत्रपतीच्या अधीन गेले असून यशवंतराव महाराज उर्फ शाहू महाराज यांच्याकडे राज्यकारभाराची सूत्रे आली. त्यावेळी छत्रपती संस्थांच्या व्यापर विषयक धोरणा बद्दल सक्षम भूमिका घेतली.

छत्रपती शाहू महाराजांचा व्यापारविषयक धोरण त्यांनी मांडलेल्या विचारातून, कार्यातून, भाषणातून स्पष्ट होते. त्यांची व्यापारा संबंधी भूमिका सक्षम होती. त्यांच्या मते उद्योग व व्यापार हे दोन्ही आर्थिक विकासाच्या महत्वपूर्ण घटक आहेत. छत्रपती शाहूनी २७ डिसेंबर १९१७ रोजी खामगाव येथील भाषणात व्यापारासंबंधी भूमिका स्पष्ट करताना म्हणतात, 'हल्ली व्यापार व उद्योग यात आम्ही पडतच नाही, विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नती व्यापार व तत्संबंधी चळवळ यावर अवलंबून आहे. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाही तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील, आर्थिक सुबत्तेसाठी व्यापार उदीम वाढला पाहिजे आणि त्यासाठी खास प्रयत्न केले पाहिजेत.[३] अशा प्रकारच्या त्यांच्या भाषणातून व्यापारासंबंधी तळमळ स्पष्ट होते. उद्योगातून रोजगार निर्मिती व्हावी, व्यापार वाढीतून समृद्धी वाढावी, त्यांचा लाभ संस्थानातील सामान्य जनतेला पोहचावा, आणि या सर्व कार्यासाठी जनतेने महत्त्वाचे योगदान द्यावे अशी त्यांची भूमिका होती.[४]

**कोल्हापूर संस्थानातील व्यापाराला चालना :**इ.स.१८९४ च्या काळात सुरुवातीस व्यापाराची स्थिती फारशी समाधानकारक नव्हती. त्यावेळी संस्थानात प्रमुख अशी कोल्हापूर शिवाय दुसरी बाजारपेठ नव्हती. अनेक ठिकाणी आठवडी बाजार भरत असत. वडगाव, आळते, कापशी, रायबाग यासारखी काही लहान व्यापारी पेठा होत्या. कोल्हापूर, पन्हाळा, वडगाव, मुरगूड, इचलकरंजी, गडहिंग्लज या सर्व बाजारपेठांमध्ये स्थानिक मालाबरोबरच बाहेरूनही माल येत असे. [५] कोल्हापूर संस्थानामार्फत आर्थिक विकेंद्रीकरणाच्या दृष्टीकोनातून विविध ठिकाणी व्यापारी पेठा स्थापन करून व्यापार वृद्धीस चालना दिली. व्यापाऱ्यांना खास सवलती देऊन वखारी घालण्यास प्रोत्साहन दिले. लहान मोठ्या व्यापाऱ्यांना संस्थानातून कर्जे उपलब्ध करून दिली. त्यामुळे कोल्हापूर संस्थानात व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली असून व्यापारी पेठा आणि व्यापारी वसाहती निर्माण करण्यासाठी संस्थानात नियोजनबध्द प्रयत्न करण्यात आले.

**व्यापारी वसाहतीची स्थापना व विस्तार :** कोल्हापूर संस्थानातील उद्योगधंद्यातून निर्माण झालेल्या मालाच्या व्यापाराचा प्रश्न फारसा महत्त्वाचा नव्हता कारण औद्योगिक वस्तू व माल मर्यादित स्वरुपात होते. मात्र शेतमालाच्या व्यापाराचा प्रश्न अधिक बिकट होता. शेतकऱ्यांनी वर्षभर कष्ट करून पिकविलेला शेतमाल विक्रीसाठी दूरवरच्या बाजारपेठेत पाठवून द्यावे लागत असे. परंतु शेतकऱ्यांच्या दृष्टीने वाहतुकीचा खर्च आणि वेळेचा अपव्यय यामुळे दूरच्या ठिकाणी शेतमाल घेऊन जाणे परवडत नसे, त्यामुळे बरेच शेतकरी स्थानिक बाजारात आपल्या मालाची विक्री करीत असत. मात्र स्थानिक बाजारात योग्य भाव मिळेल याची खात्री नसे, प्रसंगी शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असे. यासाठी बाजारपेठाची व व्यापारी वसाहतीची आवश्यकता होती त्याकरिता संस्थानाकडून प्रारंभापासूनच प्रयत्न सुरु करून संस्थानातील विविध भागात वसाहतीची स्थापना केली.

**१.शाहूपुरी वसाहत :** शाहू महाराजांनी राज्यरोहणानंतर दुसऱ्याच वर्षी इ.स. १८९५ साली 'शाहूपुरी' ही बाजारपेठ स्थापन करून व्यापाराविषयी आपला दृष्टीकोन स्पष्ट केला होता या पेठेतील मुख्य माल 'गुळ' होते. त्याकाळात गुळासाठी कोकणातील 'राजापूरची पेठ' प्रसिध्द असल्याने 'राजापुरी गुळ' या नावाने प्रसिद्धीस झाले होते.[६] छत्रपती शाहूंनी या नव्या वसाहतीत गुळाच्या व्यापाऱ्याला प्रोत्साहन दिल्याने ही बाजारपेठ 'कोल्हापुरी गुळ' या नावाने प्रसिद्धीस आले.

**२.राधानगरी वसाहत :** छत्रपती शाहूंनी आपली एकुलती एक कन्या 'राधाबाई उर्फ आक्कासाहेब' यांच्या नावाने कोल्हापूरच्या पश्चिमेस भोगावती नदीवर बांधलेल्या धरणाच्या पायथ्याशी नवी वसाहत निर्माण करून राधानगरीची स्थापना केली. कोल्हापूर संस्थानातील पश्चिमेकडील डोंगराळ व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भागातील जनतेला ही वसाहत बाजारपेठ म्हणून अधिक उपयोगी ठरावे यासाठी खास प्रयत्न केले. व्यापाऱ्यांना आपल्या व्यवसायाकरिता सरकारातून कर्जाऊ रकमा देण्यात आल्या, तसेच या दूरच्या भागातील लोकांना त्यांच्या भागात शेतमालाची विक्री करता यावी, यासाठी विशेष सोयी सवलती देण्यात आल्या. यामुळे दुर्गम भागात सुध्दा राधानगरी सारख्या व्यापारी वसाहतीची वाढ होण्यास मदत झाली.[७]

**३.शाहूवाडी वसाहत:**छत्रपती शाहू महाराजांनी आर्थिक विकेंद्रीकरणाच्या दृष्टीकोनातून आपल्या संस्थानातील विविध भागात व्यापारास उत्तेजन मिळावे, ज्या त्या भागातील जनतेच्या आवश्यक गरजांची पूर्तता व्हावी आणि आपल्याकडील अतिरिक्त शेतमालाची विक्री त्या भागातील बाजारपेठेत योग्य भावाने करता यावी. या उद्देशाने कोल्हापूरच्या वायव्य भागात शाहुवाडी या वसाहतीची स्थापना केली. त्यामुळे दुर्गम डोंगरी भागातील जनतेला आपल्या हक्काची बाजारपेठ मिळाली. या पेठेच्या विकासाकरिता सातत्याने प्रयत्न करण्यात आले.

**४.जयसिंगपुरी वसाहत :**छत्रपती शाहू महाराज आपल्या संस्थानातील पूर्वेकडील शिरोळ पेट्यातील शेतकऱ्यांसाठी बाजारपेठ स्थापन करण्याकरिता प्रयत्नशील होते. कोल्हापूर – मिरज रेल्वे मार्गावरील शिरोळ रोड रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस असलेल्या जागेवर वसाहतीची योजना आखली. त्यासाठी ११ सप्टेंबर १९१६ साली दरबारकडून खास आदेश काढला.[८] एप्रिल १९१७ च्या मुलकी ठरावानुसार वसाहतीकरिता जमीन संपादन करण्यास सुरुवात केली. सदर वसाहतीस आपल्या पित्याचे नाव देऊन त्यांची स्मृती सदैव राहावी म्हणून आपले जनक पिताश्री आबासाहेब उर्फ जयसिंगराव महाराज घाटगे कागलकर यांच्या स्मृतीपित्यर्थ २८ जुलै १९१७ च्या जाहीरनाम्यानुसार या नवीन वसाहतीस 'जयसिंगपुरी' असे नाव देण्यात आले.[९]छत्रपती शाहूंनी आपल्या कारकीर्दीच्या अंतिम टप्प्यात या जयसिंगपूरी वसाहतीची स्थापना करून पूर्वेकडील भागातील जनतेला बाजारपेठेची सोय उपलब्ध करून दिली. वसाहतीचे कामकाज लावण्यासाठी आवश्यक ते अधिकारी, कर्मचारी आणि कार्यालय याची व्यवस्था करण्यात आली. अशा प्रकारे शाहू महाराजांनी 'जयसिंगपुरी वसाहतीची' स्थापना करून एका नव्या व्यापारी केंद्राची मुहूर्तमेढ रोवली.

**कोल्हापूर संस्थातील व्यापाराकरिता सोयी सवलती :** छत्रपती शाहूंनी केवळ व्यापारी वसाहती व बाजारपेठा स्थापन करून थांबले नाहीत. तर त्या नव्याने स्थापन केलेल्या वसाहतीच्या वाढीसाठी आणि बाजारपेठेच्या विकासासाठी खास प्रयत्न केले. विविध प्रांतातून व्यापाऱ्यांना आपल्या संस्थानात व्यापार करण्यासाठी आमंत्रित केले, वसाहतीमधील जागेचे योग्य नियोजन करून विशिष्ट असा आराखडा तयार केला. लहान, मध्यम आणि मोठे अशा आकाराचे ब्लॉक्स करून त्याचे मापक व योग्य भुईभाडे घेऊन वाटप केले. तर काही वसाहतीमध्ये व्यापाऱ्यांना मोफत ब्लॉकचे वाटपही करण्यात आले. जेणेकरून वसाहतीमध्ये व्यापारी वर्गाची संख्या वाढावी हा त्या पाठीमागचा उद्देश होता. व्यापारी वसाहतीमधील ब्लॉक्स खरेदी वरील स्टॅप ड्युटी माफ करण्यात आली होती. जयसिंगपुरी वसाहतीमध्ये इमारती बांधकामाकरिता पाण्याची आवश्यकता असल्याने येथील दोन विहिरीवर मोट बांधून पाणी पुरवठा करण्याकरिता २००० रुपये मंजूर केले, सदर मोटेकरिता एक बैलजोडी व एक गडी कायम ठेवण्याच्या खर्चाकरिता दरमहा ४० रुपये मंजूर केले.[१०] वसाहतीमध्ये व्यापाऱ्यांना आकर्षित करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

**आर्थिक सवलती व सहाय्य :** विविध वसाहतीच्या स्थापनेनंतर जलदगतीने वसाहतीची वाढ होण्याकरिता करवीर दरबारकडून वेळोवेळी आर्थिक सवलती व आर्थिक मदतही जाहीर करण्यात आली. वसाहतीमधील ब्लॉकची विक्री प्रारंभी लिलाव पध्दतीने केली काही ब्लॉक नाममात्र नजराणा घेऊन जागा व्यापारासाठी उपलब्ध केली. वसाहतीमधील जागेवरील भुईभाडे पहिल्या १० वर्षापर्यंत माफ केले. १० वर्षानंतर जागेच्या आकारानुसार ४ आणे ते १ रुपया दरसालप्रमाणे आकारण्याचे जाहीर केले. कोल्हापूर स्टेट इन्कम टॅक्स अॅक्ट १९३१ कलम ९ व १० नुसार जयसिंगपूर हद्दीत उत्पन्नावर कराची माफी देण्यात आली. इ.स. १९३५ मध्ये आणखी पाच वर्षाची मुदत वाढविली. [११]तसेच व्यापारी वर्गांना आर्थिक व्यवहार पार पाडण्यासाठी अडचणी भासू नयेत याकरिता बँकेची आवश्यकता होती. व्यापाऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन बँका आणि वित्तीय संस्था यांची सुरुवात दरबाराकडून करण्यात आली. या सर्व सोयी सवलती व आर्थिक सहाय्य यामुळे छत्रपती शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या वसाहतीची भरभराट होण्यास मदत होऊन कोल्हापूर संस्थानातील व्यापारात वाढ झाली.

याच बरोबर कोल्हापूर बँकेची स्थापना,कोल्हापूर संस्थानात मार्फत व्यापारी संघटनानां स्थापनेसाठी प्रोत्साहन दिले त्यामध्ये शाहूपुरी मर्चंट्स असोसिएशन, जयसिंगपूर मर्चंट्स असोसिएशन,इचलकरंजी मर्चंट्स असोसिएशन, किराणा आणि भुसार व्यापारी संघटना, हातमाग व यंत्रमाग कापड उत्पादकांची संघटना, ग्रेन मर्चंट्स असोसिएशन, कोल्हापूर विनिमय बाजार, कृषी उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर, कृषी उत्पन्न बाजार समिती गडहिंग्लज, शेतकरी सहकारी संघ कोल्हापूर स्थापन झाल्या यातून वायपर वाढ झालेली दिसते.

**सारांश :**कोल्हापूर संस्थानाच्या १८८४ ला ब्रिटीश अधीन कोल्हापूर संस्थानाच्या व्यापार हा सुरुवातीपासून परंपरागत व्यापार चालू होता. ब्रिटीश आपल्या फायद्याच्या दृष्टीने व्यापाराची धोरण अवलंबून कोल्हापूर संस्थानातील व्यापारी विस्तार वाढवला पण त्यांनी नवीन कोणतेही व्यापारी केंद्र निर्माण न करताता परमंपरागत व्यापार चालू ठेवाला. पण कोल्हापूर संस्थानातील वजनमाप व चलन व्यवस्थेत एकसमानपणा आणला. पण व्यापाराच्या विकासाला प्रोत्साहन दिले नसल्याचे दिसून येते. याउलट १८९४ साली छत्रपतींच्या हाती सत्ता आल्यानंतर त्यांनी व्यापाराच्या विकासाकडे लक्ष दिले. उद्योग आणि व्यापार हे दोन्ही आर्थिक विकासातील महत्त्वाची क्षेत्रे आहेत. आपल्या लोकांनी व्यापार उद्योगात शिरावे आणि आपल्या बरोबर राष्ट्राच्या प्रगतीस हातभार लावावा, अशी स्पष्ट भूमिका त्यांची छत्रपतींनी होती. छत्रपती शाहूनी उद्योगधंद्याच्या प्रोत्साहनाबरोबरच व्यापाराकडेही लक्ष दिले, व्यापार आणि उद्योग हे परस्परांवर अवलंबून आहेत. उद्योगातून निर्माण होणारा माल खपविण्यासाठी बाजारपेठा पाहिजेत. शिवाय व्यापार वाढवायचा असेल तर औद्योगिक उत्पादनही हवे म्हणून महाराजांनी उद्योग आणि व्यापार दोन्ही घटकांना प्रोत्साहन दिले. आर्थिक सुबत्तेसाठी व्यापार उदीम वाढला पाहिजे आणि त्यासाठी खास प्रयत्न केले पाहिजेत अशी छत्रपती शाहूंची भूमिका होती. आर्थिक विकेंद्रीकरणाच्या दृष्टीकोनातून विविध ठिकाणी व्यापारीपेठा स्थापन करून व्यापार वाढीसाठी प्रयत्न केले. छत्रपती शाहूंनी आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभापासून व्यापारवाढीच्या दृष्टीने पावले उचलली. त्यांनी आपल्या राज्यारोहणाच्या दुसऱ्याच वर्षी इ. स. १८९५ साली शाहूपुरी ही नवी बाजारपेठ वसविण्याचे कार्य हाती घेतले. त्यानंतर राधानगरी, शाहूवाडी, जयसिंगपूर या व्यापारी वसाहतींची स्थापना केली. गडहिंग्लज, बावडा, रायबाग येथील बाजारपेठांच्या विस्तारास प्रोत्साहन दिले. त्यांच्या या कार्यामुळेच कोल्हापूर संस्थानात व्यापाराची भरभराट होऊन आर्थिक विकासाला चालना मिळाली.

**संदर्भ :**

१.चिटणीस कृ.ना., ''मध्ययुगीन भारताची संकल्पना व संस्था भाग-३, उद्योगधंदे व्यापार उद्दीम'', प्रकाशिका, नवी पेठ, पुणे, १९८५, पृ. ५९.

२. नईम एम.ए., ''द एक्सटूनल रिलेशन्स ऑफ द विजापूर किंग्डम(१४८९-१६८६), पी.एचडी. प्रबंध,(अप्रकाशित), पुणे विद्यापीठ, पुणे, पृ.२०६.

३. जाधव भगवानराव, 'राजर्षी शाहू भाषणे'', कोल्हापूर,१९७१ पृ.७.

४. पानसरे गोविंद, उपरोक्त पृ.१९८

५. प्रा.मीना कुलकर्णी व प्रा.ब.शि. कुलकर्णी, श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरी नंदन प्रकाशन,कोल्हापूर, १९७५ पृ.७.

६. पवार जयसिंगराव, [संपा.] ''राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, राजर्षी शाहू आणि शेती, उद्योगधंदे व सहकार'', इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१, पृ.२५८

७. दैनिक सत्यवादी, ''दक्षिणी संस्थान अंक'', कोल्हापूर, माहे – जून १९४०, पृ.१९०.

८.संगवे विलास, उपरोक्त खंड-७, १९९७, पृ.१९०

९. करवीर सरकारचे गॅझेट,१९१७ भाग-२, पृ.३८.

१०. जनरल हुजूर ठराव बुक नं.१७२,१९१८,अ.नं.२३८.

११. करवीर सरकारचे गॅझेट, जुलै १९१७ भाग-२,पृ.३८.